

# अनाथांच्या चेहऱ्यावरील आनंद हाच नवरात्रोत्सव - सिध्दार्थ ठाकूर

**वसई**, दि. १८ (वार्ताहर)- नवरात्र उत्सव म्हटला की, देवीची पूजा व तरुणाईला दांडिया आकर्षित करतो मात्र या दिवसांत मानवतेच्या देवींची पूजा विरार येथील युवा विकास मंडळाच्या कार्यकर्त्यांनी केली. एका आश्रमातील ३० अनाथ मुलींना नवरात्रोत्सवात याझू पार्कमध्ये सहलीला नेऊन त्यांच्या चेहऱ्यावरील आनंदाचे हसू फुलवले.

विरार, वसई भागात युवा विकास मंडळ अनेक सामाजिक उपक्रम राबवतात. याचाच एक भाग म्हणून शारदाश्रमातील ३० अनाथ मुलींना घेऊन युवा विकास मंडळाचे अध्यक्ष सिध्दार्थ ठाकूर व त्यांचे सहकारी विरार येथील याझू पार्कमध्ये पोहचले. येथे आल्यावर या मुलींना एक आनंद देणारं आकाश मिळालं, या खुल्या अंगणात ह्या मुली न्हाऊन गेल्या.लहानपणीच छत्र गेल्याने त्यांना शारदाश्रमाने आधार दिला. नवरात्रोत्सवात देवींचे दर्शन घेण्यासाठी सहलीचे आयोजन विविध मंडळाकडून केले जाते व दांडिया खेळला जातो मात्र याला बगल देत या तरुणांनी अनाथ मुलींना आनंद मिळावा म्हणून या सहलीचे आयोजन केले होते. मानवता ही ईश्वरसेवा याचा संदेश दिला. आयुष्यातील वेदना, दुख काही क्षणापुरत्या बाजूला ठेवत या मुलींनी मौजमजा केली. नवरात्रोत्सवात देवीची पूजा केली जाते. मात्र आम्ही अनाथ मुलींच्या चेहऱ्यावर आनंदाचे क्षण असावे याकरिता मानवतेच्या देवींची पूजा केली व त्याचे समाधान आम्हाला लाभले असल्याचे युवा विकास मंडळाचे अध्यक्ष सिध्दार्थ ठाकूर यांनी सांगितले.नेपाळ, आंध्रप्रदेश, कोल्हापूर, विजापूर यासारख्या विविध भागातून या मुली शारदाश्रम या अनाथाश्रमात राहत आहेत. त्यांना येथे शिक्षण देण्याचा प्रयत्न केला जातो व विनामूल्य सेवा दिली जाते. सिध्दार्थ ठाकूर यांच्याबरोबर सचिन पंडित, सनी भाटीया, अमित नाईक, मुनाफ शेख, वरुण पुरंदरे व अन्य सहकाऱ्यांनी. या अनाथ मुलींना पार्कमध्ये नेऊन त्यांच्यासोबत आनंद लुटला.